दि.०१/०७/२०२३

# माऊंट लिटेरा स्कूल

आव्हाळवाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे

## पालक शिक्षक संघ कार्यकारी मंडळाच्या सभेची नोटीस

माऊंट लिटेरा स्कूल, आव्हाळवाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या कार्यकारी मंडळाची सभा दि।5/7/२०२३ रोजी सायंकाळी  वाजता विद्यालयाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली असून नियोजित सभेमध्ये खालील प्रमाणे विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तरी आपण सदर सभेस प्रत्यक्षात उपस्थित राहून चर्चे मध्ये सहभागी व्हावे.

**सभेचे विषय** : १) उपस्थित कार्यकारींनी सदस्यांचा परस्परांशी परिचय करवून घेणे.

२) मुख्याध्यापकांकडून सादर करण्यात येणाऱ्या वार्षिक शालेय अभ्यासक्रम व सह शालेय उपक्रमाच्या नियोजनाचे अवलोकन करणे.

३) शालेय व्यवस्थापनाकडून सादर करण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्कास मान्यता देणे.

४ ) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

Shalini 1/7/23
सचिव

(मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने)

(टीप : सभेच्या नियोजित दिवशी वेळेत गणपूर्ती न झाल्यास नियोजित वेळेनंतर अर्धा तास थांबून सभा ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्यात येईल. तेव्हा गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.)

माऊंट लिटेरा स्कूल, आव्हाळवाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. 05/7/२०२३ रोजी सायंकाळी  वाजता विद्यालयाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सभेची सूचना मिळाली.

| अ.क्र | सदस्याचे नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | शविंदर कौर | अध्यक्ष | [signature] |
| २ | अमीत पंडिता | उपाध्यक्ष | Amit Pandita |
| ३ | शालिनी भटनागर | सचिव | Shalini |
| ४ | हर्षिता खरबंदा | कार्यकारी मंडळ सदस्य | Harshita |
| ५ | प्रकाश सिन्हा | पालक सदस्य | Khushboo Sinha |
| ६ | श्याम कुमार मिश्रा | पालक सदस्य | [signature] |
| ७ | सौमित्र भटनागर- | पालक सदस्य | Saumitra |
| ८ | श्वेता अगरवाल | पालक सदस्य | [signature] |
| ९ | प्रभाकरण | पालक सदस्य | [signature] |
| १० | सचिन पाटील | पालक सदस्य | Sachin |
| ११ | शशांक भोसले | पालक सदस्य | Shashank |
| १२ | प्रकाश द्विवेदी | पालक सदस्य | Prakash Dwivedi |
| १३ | सोनम तलवार | शिक्षक सदस्य | Sonam |

MOUNT LITERA ZEE SCHOOL WAGHOLI

## पालक शिक्षक संघ कार्यकारी मंडळाच्या सभेचे प्रोसेडिंग

माऊंट लिटेरा स्कूल, आव्हाळवाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाच्या कार्यकारीणीची सभा आज दि. १५/०७/२०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यालयाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती कार्यकारीणीचे अध्यक्ष अध्यक्षस्थानी विराजमान झाल्या नंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस प्रारंभ झाला.

सभेच्या प्रारंभी मा. सचिवांनी सर्व नव नियुक्त सभासदांचे स्वागत केले व परस्परांचा परिचय करून दिला व खालील विषयां प्रमाणे सभेस सुरूवात केली.

**विषय क्र. १. उपस्थित कार्यकारींनी सदस्यांचा परस्परांशी परिचय करवून घेणे.**

मा. सचिवांनी सभेस उपस्थित राहिलेल्या नवनियुक्त सदस्यांचा शालेय प्रतिनिधींचा व व्यवस्थापन प्रतिनिधींचा परस्परांसोबत परिचय करून दिला सर्व सदस्यांचा परिचय झाल्या नंतर मा. सचिवांनी सर्वांना स्थानापन्न होण्याच्या सूचना केल्या. व मा. अध्यक्षांच्या परवानगीने पुढील प्रमाणे विषय चर्चेकरीता घेतले.

**विषय क्र. २. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांचेकडून सादर करण्यात आलेले शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक शालेय अभ्यासक्रम व सहशालेय उपक्रम यांचे अवलोकन करून त्यास मंजूरी देणे.**

मा. सचिवांनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या सादर केलेल्या वार्षिक शालेय अभ्यास क्रमाच्या व सह-शालेय उपक्रमाच्या नियोजनाची प्रत उपस्थित सर्व सदस्यांना अवलोकनार्थ दिली, सदर प्रतीचे वाचन सर्व सदस्यांनी केल्यानंतर उपस्थितांमध्ये सदर बाबत सखोल चर्चा करण्यात आली चर्चे अंती मा. सचिवांनी असा प्रस्ताव मांडला की, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांनी सादर केलेल्या वार्षिक शालेय अभ्यासक्रम व सहशालेय उपक्रम यांच्या नियोजनास मान्यता देण्यात यावी. सदर प्रस्तावास अनुमोदन प्राप्त झाले.उपस्थित सदस्यांमध्ये सदर प्रस्तावाबाबत सखोल चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ठराव : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या च्या वार्षिक शालेय अभ्यासक्रम व सहशालेय उपक्रम यांचे अवलोकन करून त्यास पालक शिक्षक संघाच्या कार्यकारींनीची मान्यता देण्यात येत आहे.**

**ठराव सर्वानुमते संमत.**

सूचक : Harshita Khorbanda

अनुमोदक : Sachin Patil

**विषय क्र. ३ शालेय व्यवस्थापनाकडून सादर करण्यात येणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ च्या शैक्षणिक शुल्कास मान्यता देणे.**

मा. सचिवांनी विद्यालयाच्या व्यवस्थापणाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ करीता खालील प्रमाणे सादर केलेल्या वार्षिक शैक्षणिक शुल्काची प्रत उपस्थित सर्व सदस्यांना अवलोकनार्थ दिली.

| इयत्ता | शै. वर्ष २०२३-२४ | | इयत्ता | शै. वर्ष २०२४-२५ | | इयत्ता | शै. वर्ष २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टर्म फी | ट्यूशन फी | | टर्म फी | ट्यूशन फी | | टर्म फी | ट्यूशन फी |
| १ ली | ८००० | ७२००० | १ ली | ९५०० | ७५६०० | १ ली | ११००० | ८३१६० |
| २ री | ८००० | ७२००० | २ री | ९५०० | ७५६०० | २ री | ११००० | ८३१६० |
| ३ री | ८००० | ७२००० | ३ री | ९५०० | ७५६०० | ३ री | ११००० | ८३१६० |
| ४ थी | ८००० | ७२००० | ४ थी | ९५०० | ७५६०० | ४ थी | ११००० | ८३१६० |
| ५ वी | ८००० | ८०००० | ५ वी | ११००० | ८४००० | ५ वी | १२५०० | ९२४०० |
| ६ वी | ८००० | ८०००० | ६ वी | ११००० | ८४००० | ६ वी | १२५०० | ९२४०० |
| ७ वी | ८००० | ८०००० | ७ वी | ११००० | ८४००० | ७ वी | १२५०० | ९२४०० |
| ८ वी | ८००० | ८०००० | ८ वी | ११००० | ८४००० | ८ वी | १२५०० | ९२४०० |

उपस्थित सर्व सदस्यांमध्ये शालेय व्यवस्थापणाने सादर केलेल्या शैक्षणिक शुल्काबाबत सखोल चर्चा करण्यात आली चर्चे अंती मा. सचिवांनी असा प्रस्ताव मांडला की, विद्यालयात सद्य स्थितीला उपलब्ध असलेल्या शैक्षणिक व भौतिक सुविधा व भविष्यात उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक व भौतिक सुविधांचा आढावा घेतल्यास मा. व्यवस्थापनाद्वारा सादर करण्यात आलेले

शैक्षणिक शुल्क व टर्म शुल्क हे रास्त आहे. तरी सदर प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ पर्यंतच्या शैक्षणिक शुल्कास माऊंट लिटेरा स्कूल आव्हाळ वाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाच्या कार्यकारीणीने मान्यता द्यावी. सदर प्रस्तावास अनुमोदन प्राप्त झाले. उपस्थित सदस्यांमध्ये सदर प्रस्तावाबाबत सखोल चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ठराव : व्यवस्थापनाद्वारा सादर करण्यात आलेल्या शै. वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ च्या शैक्षणिक व टर्म शुल्कास माऊंट लिटेरा स्कूल आव्हाळ वाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाच्या कार्यकारीणीची मान्यता देण्यात येत आहे.**

सूचक : Harshita Kharbanda

अनुमोदक : Sachin Patil

सभेमध्ये मा.उपस्थित सदस्यांद्वारा आयत्यावेळी कोणतेही विषय चर्चेकरीता ठेवण्यात न आल्याने, मा. सचिवांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याची घोषणा केली.

अध्यक्ष

MOUNT LITERA ZEE SCHOOL WAGHOLI

माऊंट लिटेरा स्कूल, आव्हाळवाडी, केसनंद रोड, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे या विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाच्या कार्यकारीणीची सभा दि.१४/०७/२०२३ रोजी सायंकाळी वाजता विद्यालयाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती सदर सभेस खालील प्रमाणे सदस्य हजर होते.

| अ.क्र | सदस्याचे नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | शविंदर कौर | अध्यक्ष | |
| २ | अमीत पंडिता | उपाध्यक्ष | Amit Pandita |
| ३ | शालिनी भटनागर | सचिव | Shalini |
| ४ | हर्षिता खरबंदा | कार्यकारी मंडळ सदस्य | Harshita. |
| ५ | प्रकाश सिन्हा | पालक सदस्य | Khushbusingh |
| ६ | श्याम कुमार मिश्रा | पालक सदस्य | |
| ७ | सौमित्र भटनागर- | पालक सदस्य | Saumitra |
| ८ | श्वेता अगरवाल | पालक सदस्य | |
| ९ | प्रभाकरण | पालक सदस्य | |
| १० | सचिन पाटील | पालक सदस्य | Sachin |
| ११ | शशांक भोसले | पालक सदस्य | Shashank |
| १२ | प्रकाश द्विवेदी | पालक सदस्य | Prakash Dwivedi |
| १३ | सोनम तलवार | शिक्षक सदस्य | Sonam. |

MOUNT LITERA ZEE SCHOOL WAGHOLI ***